२ मे २००६

श्री. धनसिंग चौधरी,

नमस्कार

मी आणि माझी मुलगी अक्षरा आम्ही १८ डिसेंबरला तुमची कार्यशाळा केली. तेव्हा माझ्या लक्षात आले की संमोहन हे एक शास्त्र आहे, बुवाबाजी नाही.

त्या कार्यशाळेत तुम्ही दिलेल्या ध्वनीफिती आम्ही नियमितपणे ऐकतो. आणि मला सांगायला आनंद वाटतो की माझ्या ८वीत शिकणाऱ्या लेकीला अभ्यासासाठी त्यांचा अतिशय फायदा झाला. अक्षरा मुळातच अभ्यासू आणि हुशार आहे. परन्तु पूर्वी ती परीक्षेचे दडपण घेत असे. वाचलेले सर्व ऐनवेळी आठवेल की नाही ह्याची तिला भीती वाटत असे. संमोहन कार्यशाळेनंतर ती अधिक आत्मविश्वासानी आणि शांतपणानी परीक्षेला जाऊ लागली. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे ५ फेब्रुवारीला तिला लागोपाठ दोन गणिताच्या अतिशय अवघड परीक्षा द्यायची वेळ आली. एक परीक्षा ९।। ते ११। सकाळी तर दुसरी १२ ते ४ दुपारी. दोन्ही परीक्षा डोक्याला ताण देणाऱ्या. परीक्षेला जाताना अक्षरा तुमची कॅसेट ऐकून गेली, शांतपणे परीक्षा देऊन आली. निकाल - पहिल्या परीक्षेत ९०% गुण तर दुसऱ्या परीक्षेत पुणे विभागात पहिली आणि महाराष्ट्र राज्यात पहिल्या दहा क्रमांकात - आणि अतिशय

सन्मानाची शिष्यवृत्ती मिळवली.
लोकांनी एक शास्त्र म्हणूनच संमोहनाकडे पहावे. कुठल्याही अंधश्रध्दा न बाळगता ह्या शास्त्राच्या मदतीने स्वतःमधे सुधारणा घडवून आणाव्यात. विशेषतः विद्यार्थ्यांनी अभ्यासाला ह्या शास्त्राची जोड देऊन गुणवत्ता वाढवावी.
माझ्या मुलीच्या यशातील तुमचा वाटा महत्वाचा आहे. त्याबद्दल मनापासून आभार.
कळावे.
आपली विश्वासू,
सौ. जोगी (अक्षराची आई)

# महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ

## गणित प्रज्ञा स्पर्धा

# प्रशस्ति पत्र

### इयत्ता ८ वी

गणित प्रज्ञा स्पर्धा २००५ - २००६ मध्ये

कुमार / कुमारी जोगी अक्षरा रवींद्र

शाळा अभिनव विद्यालय इं.मि. स्कूल, पुणे-४

याने / हिने (विशेष प्रावीण्य / गुणवत्ता) संपादन केल्याबद्दल

हे प्रशस्ति पत्र देण्यात आले आहे.

| सचिव | अध्यक्ष | कार्यवाह | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| परीक्षा समिती | | महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळ | |